| | | | |
|---|---|---|---|
| CNR No- MHRT090002302024 | दाखल तारीख | : | ०२/०८/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | ०२/०८/२०२४ |
| | निकाल तारीख | : | **१३/०६/२०२६** |
| | कलावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | ०१ १० ११ |

**फॉर्म नं. XXXII**

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i))**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा, ता.लांजा, जि.रत्नागिरी यांच्या न्यायालयात**

**(एस. आर. जोशी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी लांजा यांचेसमोर)**

**न्यायनिर्णय दिनांक –१३/०६/२०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११८/२०२४**

**निशाण – १९**

| | |
|---|---|
| | गु.र.क्र. ६६/२०२४ लांजा पोलीस ठाणे, लांजा.<br>महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा. |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासनाकरीता तपासिक अंमलदार लांजा पोलीस ठाणे, ता. लांजा, जि.रत्नागिरी.** |
| **अभियोग पक्षातर्फे प्रतिनिधीत्व** | **श्री. एस. एस. वळवी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.** |
| **आरोपी** | **अनिल तुकाराम रेवाळे,**<br>वय- ४५ वर्षे, व्यवसाय-शेती,<br>रा. गवाणे रेवाळेवाडी, ता. लांजा, जि.रत्नागिरी |
| **आरोपीतर्फे प्रतिनिधीत्व** | **वकील श्री. एन. के. चव्हाण** |

**भाग 'ब'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii))**

| | |
|---|---|
| **गुन्हयाची तारीख** | १२/०६/२०२४ |

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.06.13 15:24:05 +0530

| | |
|---|---|
| **फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख** | १२/०६/२०२४ |
| **दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख** | ०२/०८/२०२४ |
| **आरोपी विरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख** | १५/०७/२०२५ |
| **पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख** | २१/०८/२०२५ |
| **निकालाची आरक्षीत तारीख** | लागू नाही |
| **निकालाची तारीख** | १३/०६/२०२६ |
| **जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख** | लागू नाही |

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामिनावर सोडलेची तारीख** | **दोषारोप ठेवलेले गुन्हे** | **निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली** | **दिलेली शिक्षा** | **फौ.प्र.स.कलम ४२८ संपरिक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **अनिल तुकाराम रेवाळे** | -------- | ०४/०३/२०२५ | **महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई)** | निर्दोष मुक्त करण्यात आले. | लागू नाही. | लागू नाही. |

**<u>न्यायनिर्णय</u>**

प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे चालविण्यात आलेला आहे.

**<u>खटल्याचा सारांश थोडक्यात खालील प्रमाणेः-</u>**

**०२.** दि. १२/०६/२०२४ रोजी फिर्यादी लांजा पोलिस ठाण्यात नेमणूकीस

JOSHI SNEHAL RAJAN Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN Date: 2026.06.13 15:24:11 +0530

असताना पो. हे. कॉ. १२३५ एन. एस. नावळेकर यांना मौजे गवाणे रेवाळेवाडी येथे अवैध गावठी हातभट्टी दारूविक्रीचा चोरटा व्यवसाय चालू असल्याची विश्वसनीय बातमी मिळाली. सदरची हकीकत वरिष्ठांना कळवून छाप्यासाठी पो. नि. लांजा यांचे मार्गदर्शनाखाली फिर्यादी तसेच सोबत पो. हे. कॉ. १२३५ एन. एस. नावळेकर, पो. हे. कॉ. ११९८ आर. अे. कांबळे, म. पो. कॉ. ७३१ डी. बी. भोपळे असे छाप्याकामी लागणाऱ्या साहित्यासह खाजगी मोटारसायकलने सी. सी. टी. एन. एस. प्रणालीमध्ये नोंद क्र. १६, १७.३० वाजता नोंद करून लांजा पोलिस ठाणे येथून गवाणेगावी रवाना झालेत. गवाणे रेवाळेवाडी येथील फाटयाजवळ गेले असता तेथे दोन पंचांना बोलावून घेवून त्यांना छाप्याचा उद्देश सांगितला.

**०३.** पोलिस व पंच असे रेवाळेवाडी फाटयावरून रेवाळेवाडीकडे जाणारे डांबरी रस्त्याने पाहणी करीत जात असताना रस्त्याचे उजवे बाजूला एका घराचे शेजारी असलेल्या शेतामध्ये एका फणसाच्या झाडाखाली एक इसम आपल्या पुढयात प्लॅस्टीक कॅन व ग्लास घेवून बसलेला दिसला. त्याचा संशय आल्याने त्याला जागीचा १८.०५ वाजता धरले व त्याचे ताब्यात मिळून आलेल्या कॅनची खात्री करून पाहणी केली असता कॅनमध्ये गावठी हातभट्टीची दारू असल्याची खात्री झाली. सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव अनिल तुकाराम रेवाळे, वय ४५ वर्षे, रा. गवाणे रेवाळेवाडी, ता. लांजा, जि. रत्नागिरी असे सांगितले. आरोपीचे ताब्यात एक १० लिटर मापाचा सफेद मळकट रंगाचा कॅन त्याला वरील बाजूस हिरव्या रंगाचे प्लॅस्टीकचे फिरकीचे बूच असून त्यामध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारू व एक दारूचा काचेचा ग्लास असा मुद्देमाल मिळून आला. त्यानुसार लांजा पोलिस ठाणे येथे गु. र. क्र. ६६/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ ई अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली. सदर फिर्यादीनुसार संपूर्ण तपास करुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०४.** निशाण ०७ येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ ई प्रमाणे आरोपीचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** अभियोग पक्षाने त्यांचा पुरावा दाखल केला. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.06.13 15:24:17 +0530

संहिता, १९७३ चे कलम ३१३ अंतर्गत निवेदन (निशाण १८) नोंदविण्यात आले. आरोपीचे निवेदनातील कथनावरुन तसेच आरोपीने अभियोग पक्षाचे साक्षीदार यांचा ज्या बचावाच्या आधारे उलटतपास घेतला त्या बचावावरुन आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली आहे असा आरोपीचा बचाव आहे. आरोपीने आपले बचावाच्या पुष्टयर्थ स्वतःला अगर अन्य साक्षीदारांना तपासलेले नाही.

**०६.** अभिलेखातील सर्व कागदपत्रे वाचली. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता **श्री. एस. एस. वळवी** व आरोपीतर्फे वकील **श्री. एन. के. चव्हाण** यांचा युक्तिवाद ऐकला.

**०७.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता व अभियोग पक्ष व बचाव पक्ष यांचे तर्फे युक्तिवाद ऐकल्यानंतर या न्यायालयापुढे पुढील मुद्दे उपस्थित झाले आहेत. ते मुद्दे व त्या मुद्दयांवरील कारणमिमांसेसह निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. दिनांक १२/०६/२०२४ रोजी १८.०५ वाजताचे सुमारास मौजे गवाणे रेवाळेवाडी, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथे आरोपीचे ताब्यात गैरकायदा बिगर परवाना एक १० लिटर मापाचा सफेद मळकट रंगाचा कॅन त्यामध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारू व एक दारूचा काचेचा ग्लास असा मुद्देमाल मिळून आला व व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | ....**नाही**. |
| २. अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः-**

**०८.** महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा

JOSHI SNEHAL RAJAN Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN Date: 2026.06.13 15:24:23 +0530

शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने कलम ६५(ई) नुसार आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील नियमांचे उल्लंघन करुन मादक द्रव्य (अफु किंवा भांग व्यतीरीक्त) विक्री केलेले आहे किंवा विकत घेतलेले आहे हे शाबित करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये आरोपीने गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने शाबित केले आहे किंवा कसे, हे तपासण्यासाठी अभियोग पक्षाने या कामी सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन होणे आवश्यक आहे.

**०९.** प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाने पंच साक्षीदार श्री. प्रदिप केशव रेवाळे यांना व दुसरे पंच साक्षीदार श्री. प्रकाश शंकर पडये यांना अनुक्रमे साक्षीदार क्र. १ व २ म्हणून निशाण ०९ व १२ येथे तपासले आहे. यातील साक्षीदार क्र. १ याने त्याची पंचनाम्यावरील सही नाकारली. तसेच साक्षीदार क्र. २ याने पंचनाम्यातील सर्व मजकूर नाकारून केवळ पंचनाम्यावरील सहया (निशाण अ-१/अ.सा.२) एवढेच मान्य केले आहे. त्या साक्षीदाराच्या साक्षीवरून असे दिसते की, सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही.

**१०.** अभियोग पक्षाने सदर खटल्यामध्ये श्री. विकास सोपान पवार सदरहू खटल्याचे फिर्यादी यांना साक्षीदार क्र. ३ म्हणून निशाण १३ येथे तपासले. सदर साक्षीदाराने त्याचे सरतपासात दि. १२/०६/२०२४ रोजीची हकीकत सविस्तरपणे सांगून त्याने त्या दिवशी दाखल केलेली फिर्याद (निशाण अ-२/अ.सा.३) व प्रथम खबरी अहवाल (निशाण अ-३/अ.सा.३) शाबीत केला आहे. त्याने त्याचे सरतपासामध्ये मुद्देमालाचे वर्णन विस्तृतपणे सांगितले आहे.

**११.** सदर साक्षीदाराचा आरोपीचे सन्माननीय वकीलांतर्फे उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्याने घटनास्थळाचा मालमत्ता क्रमांक सांगू शकत नसल्याचे कथन केलेले आहे.

**१२.** अभियोग पक्षाने नंदा शिवाजी मोहिते यांना साक्षीदार क्र. ४ म्हणून निशाण १६ येथे तपासले आहे. त्यांचे सरतपासामध्ये गु. र. क्र. ६६/२०२४ मधील मुद्देमाल त्यांनी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा कोल्हापूर येथे जमा केला व त्याबाबतची पोहोच त्यांनी लांजा पोलिस ठाण्यातून देण्यात आलेल्या रिपोर्टवर घेतली. तसेच त्यांनी सदरची पोहोच पावती मुद्देमाल कारकून यांचेकडे जमा केली. सदर पोहोच घेतलेला रिपोर्ट (निशाण अ-४/अ.सा.४)

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.06.13 15:24:29 +0530

त्यांचे साक्षीदरम्यान शाबीत केला आहे.

**१३.** साक्षीदार क्र. ४ यांचा आरोपीच्या सन्माननीय वकीलांतर्फे उलटतपास घेण्यात आला. उलटतपासात साक्षीदाराने मुद्देमाल ताब्यात घेतल्याचा स्वतंत्र पंचनामा केलेला नसल्याचे कथन केलेले आहे.

**१४.** अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व साक्षीदारांच्या जबाबांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यातील साक्षीदार क्र. ३ व ४ यांनी सरतपासात तथाकथित घटना सविस्तरपणे सांगितली आहे. ते पोलिस कर्मचारी आहेत म्हणून व त्यांच्या उलटतपासातील कथने वाचून त्यांची सरतपासाचे दरम्यान आलेली कथने नाकारण्याचे काही कारण नाही.

**१५.** येथे हे नमूद करणे गरजेचे आहे की, महाराष्ट्र दारुबंदी खटल्यामध्ये पंच व तपासणी अहवाल (सी.ए. रिपोर्ट) हे महत्त्वाचे पुरावे असतात. प्रस्तुत खटल्यात तपासणी अहवाल शाबीत झालेला नाही. तसेच या खटल्यातील पंच साक्षीदार श्री. प्रदिप (अ.सा.क्र. १) व श्री. प्रकाश (अ.सा.क्र. २) यांचे निशाण ०९ व १२ येथील साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदरहू खटल्यातील पंच साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही. पंच हा महाराष्ट्र दारुबंदी खटल्यातील एक स्वतंत्र व महत्त्वपूर्ण साक्षीदार आहे. परंतू याकामात सदर पंच साक्षीदार श्री. प्रदिप (अ.सा.क्र. १) व श्री. प्रकाश (अ.सा.क्र. २) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसून येते. या खटल्यात अभियोग पक्षाने पंच साक्षीदार श्री. प्रदिप (अ.सा.क्र. १) व श्री. प्रकाश (अ.सा.क्र. २) यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे निव्वळ साक्षीदार क्र. ३ व ४ यांचे साक्षीच्या आधारावर आरोपीला दोषी ठरविता येवू शकत नाही. तसेच प्रस्तुत खटल्यात मुद्देमाल देखील न्यायालया समक्ष आणला गेलेला नाही.

**१६.** वरील सर्व चर्चेचे अवलोकन करता मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबतः-**

**१७.** फौजदारी खटल्यांमध्ये अभियोग पक्षाने त्याची हकीकत संशयाच्या पलीकडे (beyond reasonable doubt) शाबीत करणे गरजेचे आहे. परंतु प्रस्तुत खटल्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, अभियोग पक्ष सदर हकीकत संशयाच्या

JOSHI SNEHAL RAJAN Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN Date: 2026.06.13 15:24:36 +0530

पलीकडे (beyond reasonable doubt) शाबीत करू शकलेला नाही. त्यामुळे, सबळ पुराव्या अभावी आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहेः-

## आ दे श

**१.** आरोपी **अनिल तुकाराम रेवाळे** यांस महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) चे गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करणेत येत आहे.

**२.** आरोपीचे पूर्वीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** या निर्णयाच्या विरोधात अपीलकामी अथवा अर्जाच्या अनुषंगाने वरीष्ठ न्यायालयात हजर राहण्यासाठी आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) अन्वये त्याचे रक्कम रूपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा सहा महिने कालावधीचा जामिन बंधपत्र द्यावे.

**४.** जप्त मुद्देमाल १० लिटर गावठी हातभट्टीची दारू असलेला १० लिटर मापाचा सफेद मळकट रंगाचा कॅन व एक काचेचा दारुचा ग्लास हा दोषारोपपत्रामधील विल्हेवाट या रकान्यामध्ये म्हटल्याप्रमाणे 'मा. उपविभागीय पोलिस अधिकारी लांजा यांचेकडील जावक क्र. १५१५/२०२४ दि. २२/०६/२०२४ अन्वये नाश करण्यात आलेला आहे.' नाश केला असल्याचे दिसून येते. तरी मुद्देमालाबाबत कोणताही आदेश पारीत केला जात नाही.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.06.13 15:24:43 +0530

**दिनांक १३/०६/२०२६.** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा,**

**ता. लांजा जि.रत्नागिरी.**

# परिशिष्ट

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(**iii**))

**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी साक्षीदारांची यादी**

| **क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** | **निशाण** |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | प्रदिप केशव रेवाळे | पंच साक्षीदार | ०९ |
| अ.सा.२ | प्रकाश शंकर पडये | पंच साक्षीदार | १२ |
| अ.सा.३ | विकास सोपान पवार | फिर्यादी/ पोलिस साक्षीदार | १३ |
| अ.सा.४ | नंदा शिवाजी मोहिते | पोलिस साक्षीदार | १६ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** | **निशाण** |
|---|---|---|---|
| **नाही** | | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** | **निशाण** |
|---|---|---|---|
| **नाही** | | | |

**सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी**

**अ. सरकारी**

| **क्रमांक** | **निशाण** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | अ-१/अ.सा.२ | पंचनाम्यावरील साक्षीदार क्र. २ ची स्वाक्षरी |

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.06.13 15:24:52 +0530

| | | |
|---|---|---|
| २ | अ-२/अ.सा.३ | फिर्याद |
| ३ | अ-३/अ.सा.३ | प्रथम खबरी अहवाल |
| ४ | अ-४/अ.सा.४ | मुद्देमाल पोहोच |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाण | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

**क. न्यायालयीन निशाण**

| क्रमांक | निशाण | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | -- | एक १० लिटर मापाचा सफेद मळकट रंगाचा कॅन त्याला वरील बाजूस हिरव्या रंगाचे प्लॅस्टीकचे फिरकीचे बूच असून त्यामध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारू |
| २ | -- | एक दारूचा काचेचा ग्लास |

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.06.13 15:24:59 +0530

**दिनांक १३/०६/२०२६.** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा,**

**ता. लांजा जि.रत्नागिरी.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 13/06/2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 13/06/2026 |
| Order uploaded on | :- | 13/06/2026 |